



ISSN - No. 2319-9318

*Peer Reviewed International Research Journal*

# VIDYAWARTA

*Special Issue.*

Ashti Taluka Shikshan Prasarak Mandal's

## Arts,Commerce and Science College, Ashti

Tal.Ashti, Dist.Beed (MS)

Accredited by NAAC B++ Grade with 2.78 CGPA,
ISO 9001:2015, Green Audited College



**Interdisciplinary National Conference on**

## Recent Trends in Social Sciences & Commerce

27th February 2018

# HISTORY AND SOCIOLOGY

Organizer
Dr. S. R. Nimbore
Principal

Scanned by CamScanner
Scanned by CamScanner

# Index

## Sociology


| Sr. No. | Title | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Problem's of Child Labour in Maharashtra | Dr. A. R. Wagdaw | 1 |
| 2 | Child Labour - A Serious Problem | Smt.Archana Kundlikrao Chavare | 5 |
| 3 | Millennium Development Goals and Indian Education: An Analytical Study | Dr. Beedkar Sandhya Dattopant | 7 |
| 4 | Work-Life Balance Benefits and Programmes in India | Manjunath Sanganna Mokashi Dr.Paul .G Aquinas | 15 |
| 5 | Child labour and child Issues in Maharashtra | Dr Abdul Samad Nadvi Dr.Asad Baig Dr.Syed Rafat Ali Osman | 20 |
| 6 | Role of NGO's in Combating of Child Labour in India | Talib Hussian Shapoo | 25 |
| 7 | भारतातील बाल कामगारांचे प्रकार | प्रा. डॉ. व्ही. जी. पोकळे प्रा. सोंडगे टी.पी. | 31 |
| 8 | भारतातील बालकामगार निर्मूलनासाठी उपाययोजना | प्रा. पोकळे एस.एम. | 33 |
| 9 | बालकामगार : एक गंभीर समस्या | प्रा. जाधव शामल भिमराव | 36 |
| 10 | बालकामगार एक सामाजिक समस्या | प्रा. गाडवे मनिषा महारुद्र | 41 |
| 11 | बालकामगार : एक समस्या | प्रा. भोसले एस. ई. | 44 |
| 12 | बालमजुरीची कारणे आणि परिणाम | प्रा. राठोड बी.जे. | 46 |
| 13 | बीड जिल्ह्यातील शेतकरी बालकामगाराच्या विविध प्रकाराचा समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. डॉ. यादव घोडके | 49 |
| 14 | बालमजूरी एक सामाजिक समस्या | प्रा.गजानन भिकाजी फुलसावंगे | 54 |
| 15 | बालकामगार समस्येची कारणे | चोंडे अंबिका गोविंदराव | 56 |
| 16 | बालकामगार : एक सिंहावलोकन | प्रा.डॉ.दामावले डी.एन. | 58 |
| 17 | बालकामगारांच्या समस्या : कारणे व उपाय | प्रा. डॉ. मनिषा देशमुख | 61 |
| 18 | भारतातील बालकामगार समस्येची कारणे आणि परिणाम | प्रा. डॉ. गोरे बी. एम. | 65 |
| 19 | बालकामागर | मनिषा खंडागळे | 68 |
| 20 | बाल कामगार समस्येची कारणे | प्रा.डी.पी. मुंढे | 72 |
| 21 | महिला सक्षमीकरणात भारतीय कायद्यांची भूमिका | प्रा. बी.पी. पवार | 75 |
| 22 | बालमजूरी एक सामाजिक समस्या : कारणमिमांसा | डॉ.घायाळ एस. पी. | 78 |
| 23 | बालकामगारांची समस्या : हक्क आणि कायदे - एक अभ्यास | प्रा. प्रदीप दाजीबा पाटील | 81 |


Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

 ISSN – 2319 9318

# बालकामगार : एक गंभीर समस्या

**प्रा. जाधव शामल भिमराव**
मिल्लिया महाविद्यालय, बीड
गृहशास्त्र विभाग

**प्रस्तावना :-**

जगात सर्वत्र आणि भारतात देखील त्यांच्या लाखो मुले बालमजुरीत गुंतल्याने त्यांच्या शिक्षणावर, विकासावर आणि भविष्यातील उदरनिर्वाहावर अयोग्य परिणाम होत आहे. बालमजुरी ही फक्त भारताचीच समस्या नसून पूर्ण जगातील गंभीर समस्या आहे. बालमजुरांपैकी बहुतेकजण धोकादायक आणि शोचनिय परिस्थितीत काम करीत असल्याने त्याचे अपरिमीत शारीरिक व मानसिक नुकसान होत आहे. शिक्षण, आरोग्य, मनोरंजन, सहभाग या बाल हक्कापासून ही बालमजुरी करणारी बालकें वंचीत राहतात. बालमजुरी केवळ कुटूंबालाच नव्हे तर अवघ्या देशालाही आर्थिक दृष्ट्या नूकसान कारक आहे. कारण बालमजुरीमुळे ते कुटूंब गरीब आणि अकूशल कामाच्या विळख्यात आडकूण पडते.

बालमजुरीची सुरूवात औद्योगिक क्रांतीनंतर झाली भांडवलदारांनी आपल्या नफ्यात वाढ करण्यासाठी अनेक बालमजूरांना कमी वेतन देऊन त्यांच्याकडून जास्तीचे दारिद्रयाखालील लोकांना आपला उदरनिर्वाह भागविण्यासाठी आपल्या कुटूंबातील लहान-लहान मुलांना शाळेची सोय नसल्यामुळे व सामाजिक जाणीव जागृतीची कल्पना नसल्याकारणाने कामावर पाठवून आपला उदरनिर्वाह भागवला जातो. यातून बालमजुरीचा जन्म झाल्याचे सिध्द होते.

बाल मजूरांना धोकादायक किंवा अन्य सर्वसाधारण उदयोगात राबवून घेतले जाते. उदा :- फटाके, भांड्याचे कारखाने, विटभट्टी, विड्याओळणे, पादत्राणे, आगपेट्या, खादी कारखाने दगडी खाणीत दगड फोडण्याचे काम अशा अनेक उदयोगात बालमजूर मोठ्या संख्येने आढळतात. या शिवाय आपल्या देशात शैक्षणिक संधीचा अभाव, गरिबी किंवा कुटूंबातील कर्त्या व्यक्तीची बेकारी किंवा मृत्यु अशा अनेक कारणाने मुलांना काम करावे लागते.

जागतीक पातळीवरचा विचार केला तर बालमजुरी विकसीत राष्ट्रात कमी तर मागासलेल्या राष्ट्रात जास्त दिसून येते. कारण गरीबी ही त्यांच्या पाचवीलाच पुजली जाते. आज मितीला भारतात एकूण लोकसंख्येपैकी 30 ते 35% लोकसंख्या दारिद्रय रेषेखाली जीवन जगते. काही लोकांना तर एक वेळचे जेवण करण्यासाठी संघर्ष करावा लागतो. भारत हा कृषीप्रधान देश आहे कृषीवर आधारित लोकसंख्या जवळपास 65% आहे. म्हणजे असंघटीत लोकांचे प्रमाण जास्त आहे.

भारतामध्ये दारिद्रयाचे प्रमाण 60 वर्षाच्या कालखंडात जेवढे कमी व्हायला पाहिजे होते. तेवढे कमी झाले नाही आजही भारतात 30% पेक्षा जास्त लोक संख्या गरिबीमध्ये जीवन जगते त्यामुळे त्यांच्या शिक्षणाची पातळी निम्न व कुटूंबाचा आकार मोठा तर काही कुटूंबात व्यसनाच्या आहारी गेल्यामुळे कुटूंबाच्या उदरनिर्वाहासाठी स्त्रिया आणि घरातील लहान मुलांना काम करावे लागते. कधी कधी कुटूंबावर उपासमारीची वेळ येते. याचाच परिणाम म्हणून लहान वयातील मुलांना मजूरी करावी लागते त्यातच त्यांचे शोषण होऊन बालकांचे जीवन कधीही फुलू शकत नाही. बालमनाचा आनंद तर मीळतच नाही. परंतू अतिशय निरस, व कंटाळवाण्या आयुष्याला त्यांना सामोरे जावे लागते. यात मुलांच्या आयुष्याचेच नव्हे तर संपूर्ण कुटूंबाचे नुकसान होते. कारण मोठेपणीही मुले अकुशल कामगार म्हून काम करतात. त्यामुळे त्यांची उत्पादन क्षमता आणि आत्मसनमान खालावलेला राहातो. शहरी भागात घरगुती मोलाची कामे केली जातात पण त्यांच्या कामाची नोंदही घेतली जात नाही.

**घटनात्मक तरतुदी :-** भारतीय राज्यघटनेत मुलांचे शोषणापासून संरक्षण व्हावे व त्यांचा विकास व्हावा यासाठी विशेष काळजी घेतलेली पुढील कलमानूसार दिसून येते. घटनेच्या 21 व्या कलमानूसार शिक्षण हा 6 ते 14 वयोगटातील मुलांचा मुलभुत अधिकार आहे. घटनेच्या 23 व्या कलमानूसार जबरदस्तीने काम करून घेणे् किंवा मनुष्य व्यापार यावर बंदी घातली आहे. 24 व्या कलमानूसार 14 वर्षाखालील बालकाला कारखान्यात, खानीत किंवा धोकादायक क्षेत्रात कामाला लावता येणार नाही. कलम 39 (इ व फ) या कलमानूसार म्हटले आहे की, राज्याचे धोरण असे असावे जेणे करून मुलांच्या अजाण व याचा गैरफायदा घेतला जाऊ नये.

**उद्देश : (Objectives) :-**

(1) बालमजुरांच्या सामाजिक, आर्थिक दर्जाचा अभ्यास करणे.
(2) बाल कामगारांच्या समस्या जाणून घेणे.



Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

(3) बाल कामगारांच्या आरोग्यविषयी माहिती करून घेणं.

(4) बाल मजुरांना आहाराविषयी माहिती देणे.

(5) बाल मजुरांना शिक्षणाबद्दल प्रोत्साहीत करणे.

(6) बाल कामगारांच्या पालकांना उत्पन्नाचे पर्यायी मार्ग शोधून देणे.

**अभ्यास पध्दती (Methodology) :-**

प्रस्तुत अभ्यास प्रामुख्याने द्वितीय साधन सामुग्रीवर अवलंबून आहे. अभ्यासासाठी विविध पुस्तके मासिके, अहवाल यांचा आधार घेऊन माहिती संकलीत करण्यात आली आहे. संकलीत केलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी Tabulation पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. तसेच हा अभ्यास द्वितीय सामुग्रीवर अवलंबून असल्यामुळे समाजामधील लहान-लहान घटकांचा अभ्यास करता आलेला नाही. ही अभ्यासावर पडलेली मर्यादा आहे.

**अभ्यासाची व्युव्हरचना :-**

(1) बाल कामगाराची व्याख्या :-

(2) बाल कामगारांची सामाजिक स्थिती

(3) बाल मजुरीचे परिणाम

(4) बाल मजुरी कमी करण्यासाठी उपाय योजना.

**(1) व्याख्या :-** "5 ते 14 वयोगटातील बालके मानसिक व शारिरीकदृष्ट्या कष्ट करण्याची कुवत नसतांना प्रचलीत वेतन दरानूसार सक्तीने काम करतात. अशा कोणत्याही कामगाराला बालकामगार असे म्हणतात."

**(2) बालकामगाराची सामाजिक स्थिती :-**

मनुष्याला जीवन जगण्यासाठी जो सामाजीक दर्जा आवश्यक असतो तेथे त्यांच्या वाट्याला हिनता येते अनेक बालकांना राहण्यासाठी घरे नाहीत शिक्षण नाही आरोग्य सुविधा मिळत नाहीत. त्यांना पिण्यासाठी शुध्द पाणी मीळत नाही एकंदरीत सामाजिक स्थिती वाईट असल्याचे दिसून येते. जया देशात बुध्द, महाविर, अशोक सम्राट, गुरूनानक, महात्माफुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मा. गांधी अशा महामानवांनी जन्म घेतला ती भुमी निश्चितच सुसंस्कृत असायला पाहिजे. परंतु या देशात नद्याी, दगडाची, पशुपक्षाची ऋषीमुनींची पुजा होते त्याच भूमीत बालकामगारांना हिन दर्जाची वागणूक मिळते.

**(3) बालमजुरीचे परिणाम :-**

बालकामगार असाध्य रोगंना बळी पडतात/पडलेत, उमेदीच्या काळात शाळा सोडल्या आयुष्यभर गुलामगिरीच करावी लागते. त्यामुळे बालके गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळलेली दिसून येतात.

1) आरोग्यावर परिणाम :

2) शिक्षणापासून वंचीत

3) गरिबीचे दुष्ट चक्र

4) मानव विकास निर्देशांक खालच्या पातळीवर राहिला.

**कार्यक्षेत्र :-**

संशोधनाच्या उद्दिष्टानुसार बीड जिल्ह्यातील बालकामगारांच्या समस्या अभ्यासण्यासाठी हा विषय निवडण्यात आला. बीड शहरातील लोकसंख्येतील प्रतिनिधी ठरू शकतील. अशा निम्न-मध्यम आर्थिक दर्जा असलेल्या 50 बाल कामगारांची प्रतिनिधीक स्वरूपात निवड केली. अभ्यास विषय "बाल कामगारांच्या समस्या" असल्यामुळे 5 ते 14 वर्ष वयोगटातील 50 मुलांची नमुना म्हणून निवड केली.

यामध्ये सर्व धर्मांच्या तसेच वेगवेगळ्या सामाजिक आर्थिक दर्जा असणाऱ्या मुलांचा समावेश करण्यात आला.

प्रस्तुत संशोधनात सर्वसामान्यांना ज्ञात होण्यासाठी संकलीत माहितीची सरासरी टक्केवारी या सांख्यकिय तंत्राचा वापर करून त्यांचे विश्लेशन व आलेखाच्या साहयाने प्रर्दशित केले आहे.



Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

**चर्चा व परिणाम : (Result and Discussion) :-**

प्रस्तुत संशोधनात उद्दिष्टाला अनुसरून बालकामगारांच्या समस्याविषयी माहिती भरून घेतली आणि बालकामगारासाठी स्वरचित प्रश्नावली वापरण्यात आली. या प्रश्नावलीतून बालकामगारांच्या गंभीर समस्या आणि त्याच्या व्यक्तीमत्व विकासावर होणारा परिणाम यासंबंधी माहिती प्राप्त झाली. 5 ते 14 वयोगटातील बाल कामगारांच्या पालकांचा सामाजीक व आर्थिक दर्जाही तपासण्यात आला.

(1) बालकामगाराचे वय

(2) पालकांचा व्यवसाय

(3) कुटुंबाचा प्रकार


(4) बालकामगाराचे कामाचे ठिकाण

**तक्ता क्रमांक 1**

**बालकामगारांचे वय**

| अ.क्र. | वय | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1) | 5-7 | 00 | 00 |
| 2) | 8 - 11 | 13 | 26% |
| 3) | 12 - 14 | 37 | 74% |
| | एकुण | 50 | 100% |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, 8 ते 11 वयोगटातील कामगार 26% आहेत तर 12 ते 14 वयोगटातील बालकामगारांचे प्रमाणे खूपच जास्त दिसून आले त्यांची 74% संख्या आहे.




**तक्ता क्रमांक 2**

**बालकामगारांचे कामाचे ठिकाण**


| अ.क्र. | कामाचे ठिकाण | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1) | घरकाम | 10 | 20% |
| 2) | सायकल मार्ट | 07 | 14% |
| 3) | कापड दुकान | 07 | 14% |
| 4) | हॉटेल | 21 | 42% |
| 5) | भंगार वेचणे | 05 | 10% |
| | **एकूण** | **50** | **100%** |



Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

वरील तक्तयावरून असे दिसून येते की, घरकाम करणारे 20% सायकल मार्टवर काम करणारे 14% कापड दूकान 14% तर हॉटेल मध्ये काम करणाराचे प्रमाण जास्त आढळून आले. तर भंगार वेचणारे मुले 10% आढळली शहरी भागांची निवड केल्याने हॉटेलमध्ये कामगारांची संख्या जास्त दिसून आली.





**तक्ता क्रमांक 3**

**बालकामगारांच्या पालकांचा व्यवसाय दर्शवणारा तक्ता**

| अ.क्र. | कामाचे ठिकाण | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1) | नोकरी | 00 | 00% |
| 2) | धंदा | 09 | 18% |
| 3) | मजुरी | 41 | 82% |
| 4) | शेती | 00 | 00 |
| | **एकूण** | **50** | **100%** |

प्रस्तुत तक्त्यावरून असे निदर्शनास आले की, नोकरी करणाऱ्या पालकांची संख्या काहीच नाही धंदा करणारे पालकांची संख्या 18% आहे. तर मजुरी करणाऱ्या पालकांची संख्या खूप मोठ्या प्रमाणत म्हणजे 82% दिसून आली. शेती करणारे कोणी नाही बाल कामगाराच्या पालकाचा व्यावसाय हा कुटूंबाचा आर्थिक दर्जा दर्शविण्याच्या दृष्टीने महत्वाचा घटक आहे. म्हणून वरील माहितीची नोंद घेण्यात आली. या तक्त्यावरून असे लक्षात येते की, निम्न व मध्यम आर्थिक गटात येणाऱ्या पालकांची संख्या जास्त आहे. कारण बालकामगार शहरी भागातील असल्याने शेती व्यवसायाकडे दूर्लक्ष दिसून आले.






Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

**निष्कर्ष :-**

तक्ता क्र. एक वरून असे निदर्शनास आले की, नौकरी करणाऱ्या पालकांची संख्या 00% आहे. धंदा करणारे 10% आहे. तर मजूरी करणारे 82% म्हणजेच मजुरी करणाऱ्या पालकांचे प्रमाण जास्त आहे.

बाल कामगारांच्या कामाच्या ठिकाणचा अभ्यास करण्यात आला त्यावरून असे दिसून आले की, घरकाम करणारी बालकामगार मुले 20% आहेत. सायकल मार्ट 14% कापड दूकान 14% तर हॉटेलमध्ये 42% तर भंगार वेचणारे 10% मुले दिसून आली. हॉटेलमध्ये काम करणारे कामगार जास्त आढळून आले आहेत. शहरी भाग निवडल्याने प्रमाण हॉटेलचेदिसून आले.

बाल कामगाराच्या वयाचा विचार केला तर 8 ते 11 वयोगटातील कामगार 26% तर 12-14 वयोगटातील 74% दिसून आले. याचा परिणाम असा की खेळण्याचे शिक्षणाच्या वयातच मजुरीला गुंतावे लागल्याने एकदर विकास व्हायचाच राहून जातो.

**शिफारशी :-** 1) नैसर्गिक प्रवृत्ती असलेला बालकाचा विकास करण्यासाठी त्याला साहय करायला हवे.

2) राष्ट्रातील मुले राष्ट्राची संपत्ती असते. त्यांचे पोषण व स्वास्थ्य जपणे जरूरी आहे.

3) ज्या प्रमाणे 1981 हे वर्ष जागतीक बालक वर्ष म्हणून केले. त्याच प्रमाणे आगामी वर्ष आपल्या देशात बालक वर्ष म्हणून जाहीर करावे व बालकाच्या दृष्टीने कृती कार्यक्रम राबविले जावेत. नुसत्या योजना न राबविता त्यांची आमलबजावणी योग्य होण्याच्या दृष्टीने सक्षम यंत्रणा राबवावी.

यामध्ये बालकामगारांच्या पालकांना रोजगार, बालकांच्या विकासासंबंधी जाणीव जागृती, आपल्या देशात बालक वर्ष म्हणून जाहीर करावे व बालकाच्या दृष्टीने कृती कार्यक्रम राबविले जावेत. नुसत्या योजना न राबविता त्यांची आमलबजावणी योग्य होण्याच्या दृष्टीने सक्षम यंत्रणा राबवावी.

यामध्ये बालकामगारांच्या पालकांना रोजगार बालकांच्या विकासासंबंधी जाणीव जागृती आहारा विषयी जाणीव जागृती निर्माण करणारी पथनाट्ये प्रत्यक्ष संपर्क पध्दती तसेच मनोरंजनाच्या माध्यमातून त्यांच्या पर्यंत पोहचल्या जावे.

**संदर्भ ग्रंथ सुची :-**

1) डॉ. जोशी अंजेली असंघटीत क्षेत्रातील बाल कामगार 2007.
2) कृतीदल सदस्याकरीता मार्गदर्शीका - यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन 0 प्रबोधिनी पुणे.
3) गोपूरकर प्रतिभा, जीवनाचा मंत्र आर.सी.सी. - 2002.
4) भारतीय बालक एक आकलन - 2002.
5) 'योजना' नोव्हेंबर - 2006.
6) समाज कल्याण माहिती पुस्तीका - में 2003
7) Selvakumar B.N. (2005) - Child Labour in India.hhttp://www.boloji.com/society/0033htm
8) राष्ट्रीय नमुना पहाणी 1999- 200.



Scanned by CamScanner

Scanned by CamScanner